क्र. पोमसं/८/६८०/पदोन्नती(व.का.अ.-काअ.)२०२२-२३/१२५/२०२२ (सीई ४५०) मुंबई, दिनांक ३० /१२/२०२२

**वाचा** :- १. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१.
२. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ,दि.०५/०७/२०२१.

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षक (गट-ब, राजपत्रित) यांना सन २०२२-२०२३ च्या निवडसूचीवर त्यांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन नियुक्तीच्या ठिकाणी त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून **वरिष्ठ कार्यालय अधीक्षक (गट-ब, राजपत्रित) (वेतनस्तर एस-१५- रु. ४१,८००/- - रु. १,३२,३००/-)** या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात* पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | सध्याचे नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. भाऊलाल अश्रुबा कुंडरे | पोमसं कार्यालय (कार्यासन क्रमांक ०९) | पोमसं कार्यालय (कार्यासन क्रमांक १६-अ) | संवर्गातील रिक्त पदात |

*सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१ अन्वये पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत असे सुचित केल्यामुळे दि.०१/०१/२००४ च्या जेष्ठतेनुसार कार्यालय अधीक्षक (राजपत्रित) यांना वरिष्ठ कार्यालय अधीक्षक (राजपत्रित) पदी पदोन्नती **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

२. **उपरोक्त प्रमाणे पदोन्नत झालेल्या अधिकारी यांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणाची यादी पदमोचक लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे किंवा संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता दयावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

३. उपरोक्त नमूद आदेश मधील पदोन्नत अधिकारी यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पीअेच्वाय्/१०८२/ सीआर/११००(२)/अेसईआर्-३, दि.०६/११/१९८४ नुसार पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम ११ (१) (अ) नुसार केली जाईल, यांची त्यांनी नोंद घ्यावी.

४. पदोन्नत झालेल्या कार्यालय अधीक्षकांचे अभिनंदन.

रजनिश सेठ
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रति,

श्री. भाऊलाल अश्रुबा कुंडरे, कार्यालय अधीक्षक, नेम. कार्यासन क्रमांक ९.
मार्फत :- पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (गोपनीय)

<u>प्रत सस्नेह अग्रेषित :-</u>

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.

<u>प्रत माहितीकरिता :-</u>

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)/ (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उपसहायक
पोलीस महासंचालक यांचे सर्व उपसहायक
कार्यासन अधिकारी, का.क्रमांक ०९,१०,१६-अ,३२ व ३६.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई.

२/- पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे १ महिन्यांसाठी उपलब्ध करुन दयावेत.

**(अनुप कुमार सिंह )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता.